# सर्व शिक्षा अभियान

## संकल्पना :-

भारतीय राज्यघटनेच्या ४५ व्या कलमानुसार ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलामुलीना प्राथमिक शिक्षण मोफत वा सक्तीचे करण्यात आले आहे. त्यानुसार सन २००२ साली घटनेत दुरुस्ती करुन शिक्षणाचा हक्क मुलभूत हक्क म्हणून प्राथमिक शिक्षणाच्या घटनेच्या २१ (अ ) या कलमात अंतर्भाव करण्यात आलेला आहे. अनेक वर्षापासून जापासलेले प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रीकीकरणाचे उददीष्टे पूर्ण करण्यासाठी सर्व शिक्षा अभियान हा कार्यक्रम सुरु करण्यात आलेला आहे. विशिष्ट कालावधीत एकात्मक पध्दतीने राज्याच्या भागीदारीने हा कार्यक्रम अंमलात येत आहे.

सर्व शिक्षा अभियान म्हणजे वाडी, वस्तीमध्ये असणाऱ्या समाजाच्या मदतीने वयोगट ६ ते १४ सर्व मुलामुलींना दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देऊन त्यांच्यामधिल मानवी क्षमतांचा विकास साधणारा नियोजनबध्द कार्यक्रम आहे. ही केन्द्र पुरस्कृत योजना असून शालेय व्यवस्थापनामध्ये समाजाच्या सक्रिय सहभागाव्दारे प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकीकरण करण्यासाठी केलेला एक वैशिष्टपुर्ण प्रयत्न आहे.

## अभियानाची वैशिष्टे :-

१) सर्व शिक्षा अभियान हा प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रीकरणाचा कालबदध कार्यक्रम होय .
२) सर्व शिक्षा अभियानातुन प्राथमिक शिक्षणाव्दारे सामाजीक न्याय वृध्दींगत करण्याची संधी प्राप्त झाली आहे.
३) सर्व शिक्षा अभियानादारे पंचायत राज संस्था ,ग्राम शिक्षण समिती, ग्रामीण व शहरी भागातील झ ोपडपटटी पातळीवरील शिक्षण समिती .पालक शिक्षक संघ ,माता पालक संघ, आदिवासी स्वायत्त संस्था आणि वस्ती पातळीवरील संस्थांना प्राथमिक शाळेच्या व्यवस्थापनात सहभागी करुन घेण्याचा प्रयत्न करणे.
४) सर्व शिक्षा अभियानाच्या कार्यवाहीत स्थानीक स्वराज संस्था, राज्य व केन्द्र सरकार यांची भागीदारी आहे.
५) सर्व शिक्षा अभियानामध्ये वाडया, वस्त्या व स्थानिक पातळीवरील गरजेनुसार पर्यायाने तालुक्याच्या जिल्हयाच्या व राज्याचा विकास साधन्याकरीता एक महत्वपूर्ण संधी प्राप्त झाली आहे.

## ध्येय : -

१) सन २०१० पर्यत ६ ते १४ वयोगटातील सर्व मुला मुलीना उपयुक्त दर्जेदार प्राथमिक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन देणे.
२) समाजाच्या / वस्तीच्या किंवा स्थानीक लोकांच्या शालेय वातावरणातील सक्रिय सहभागादवारे सामाजीक , प्रादेशीक आणि लिंग विषयक भेदभाव कमी करणे.
३) शाळा व समाज एकत्र आणून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकास साधण्याचा प्रयत्न करणे.

## उद्दीष्टे :-

१) इ.स.२००३ पुर्वी सर्व मुले शाळेत , शिक्षण हमी केन्द्रात, पर्यायी शाळेत परत आणणाऱ्या व्यवस्थेत दाखल करणे.
२) इ.स.२००७ पुर्वी सर्व मुलांना ५ वी पर्यतचे व इ.स.२०१० पुर्वी सर्व मुलांना ८ वी पर्यतचे प्राथमिक शालेय शिक्षण देणे.
३) दर्जेदार प्राथमिक शिक्षणावर तसेच जीवनासाठी शिक्षणावर भर देणे.
४) इ.स.२००७ पुर्वी प्राथमिक शिक्षणातील सर्व स्तरावरील उणिवा दुर करुन सामाजीक तसेच लिंग भेद व समाजाच्या विविध घटकांतील दरी इ.स.२००७ पर्यत भरन काढणे.

## सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यक्रम :-

१) गटसाधन केन्द्र
२) समुह साधन केन्द्र
३) शाळा बांधकाम - गरजेनुसार शाळागृहाचे बांधकाम ग्रामशिक्षण समिती मार्फत पुर्ण करण्यात येते.
४) पर्यायी शिक्षण व शिक्षण हमी योजना .वस्तीशाळा, महात्मा फुले शिक्षण हमी योजना, राजीव गांधी संधी शाळा, सेतु शाळा, हंगामी महात्मा फुले शिक्षण हमी योजना, उपचारात्मक अभ्यासक्रम .
५) नाविण्यपुर्ण उपक्रम
अ ) संगणक शिक्षण
ब ) बालशिक्षण व संगोपण .
क) मुलीचे शिक्षण
ड) अनुसुचीत जाती - जमातीच्या मुलांचे शिक्षण
इ) अल्पसंख्याक शिक्षण

६) अपंग समावेशित शिक्षण - साहित्य साधनांचा पुरवठा , अडथळा विरहीत वातावरण , शिक्षण व्यवस्था , गृहमार्गदर्शन , वैयक्तीक शैक्षणीक आराखडा , शाळेत ने-आण करण्यासाठी मदतनीस भत्ता ,लेखनीक व वाचनीक भत्ता , प्रवास भत्ता , गरजेनुसार शस्त्रक्रीया .
७) संशोधन , मुल्यमापन , पर्यवेक्षण व सनियंत्रण
८) अनुदान - शाळा, शिक्षक, देखभाल दुरुस्ती, अध्ययन-अध्यापण साहित्य अनुदान.
९) शिक्षक प्रशिक्षण
१०) लोकप्रतिनिधी प्रशिक्षण
११) मोफत पाठयपुस्तके.इयत्ता १ ली ते ८ वी तील सर्व मुला-मुलींना
१२) अध्ययन समृध्दी कार्यक्रम (LEP)
१३) सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम
१४) निकष पुर्ण करीत असलेल्या वाडया वस्तीवर नविन शाळा उघडणे.
१५) तीन किलोमीटर परिसरात उच्च प्राथामिक शाळा नसल्यास अस्तीत्वात असलेल्या प्राथमिक शाळेचे उच्च प्राथामिक शाळेत रपांतर करणे